## संपादकीय

# आशीर्वाद कसले मागता?

घरच्यांच्या विरोधास डावलून दुसरा पाट लावायचा आणि नव्या खाष्ट बायकोशी कसे जुळवून घ्यायचे हा प्रश्न पडल्यावर आईच्या आठवणीने टिपे गाळायची, असे राष्ट्रवादीतून फुटून निघालेल्या अजित पवार आणि मंडळींचे झालेले दिसते. आपले दैवत, विठ्ठल वगैरे असलेल्या शरद पवारांना सोडून भाजपशी घरोबा केल्यानंतर लागोपाठ अजितदादा आणि मंडळी थोरल्या पवारांचे 'आशीर्वाद' घेण्यासाठी दोन दिवसांत दोन वेळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानात येऊन गेली. पहिल्या दिवशी नव्यानव्या मंत्रीपदाच्या शालूतले फक्त मंत्री होते आणि दुसऱ्या दिवशी मंत्री आणि हाताला मेंदी लावून कोणी हात हातात घेईल अशी वाट पाहणारे अन्य आमदार. म्हणजे जे मंत्री झाले त्यांनाही शरद पवार यांचा आशीर्वाद हवा आणि जे मंत्री होऊ इच्छितात त्यांनाही हवा. त्याच वेळी पवार यांच्यासमवेत असलेलेही हजर होते. त्यांना तर त्यांचा आशीर्वाद हवाच हवा. अशा सर्वांना एकाच वेळी आशीर्वाद देण्याची पवार यांची क्षमता भारीच म्हणायची. तिची तुलना केळे या अद्भुत फळाशीच करता येईल. बद्धकोष्ठ असो वा अतिसार. दोनही विकारांवर केळे हे फळ उपचार म्हणून चालते म्हणतात. तद्वत पक्षातून फुटून गेलेले असोत वा न फुटता मागे राहिलेले असोत. पवारांच्या आशीर्वादाचे सर्वच भोक्ते. यातील मागे राहिलेल्यांचे सोडून देऊ. कारण त्यांची या आशीर्वादाची गरज तशी नैसर्गिक म्हणता येईल. पण पवार यांना सोडून गेलेल्यांचे काय? नवा घरोबा करायचा आणि जुन्या नातेसंबंधाचे माधुर्यही चाखत राहायचे; हे कसे?

हाच प्रश्न अजितदादा आणि अन्यांच्या कृतीवरून पडतो. कसला आशीर्वाद त्यांना हवा? आणि कशासाठी? मुळात त्याची गरजच काय? खरे तर खऱ्या कर्तृत्ववानाप्रमाणे या मंडळींनी आता मागे पाहायचे कारण नाही. तशीही छगन भुजबळ वगैरे मंडळी सरावलेलीच आहेत. अशा नवनव्या घरोब्यांची त्यांना सवय नाही, असे अजिबात नाही. खरे तर या कर्तृत्ववानांनी स्वत:चा एखादा पक्ष आधी स्थापून आणि चालवून दाखवत स्वत:ची क्षमता सिद्ध करायला हवी. तसे काही करण्याची कुवत यातील एकाकडेही नाही. छगन भुजबळ यांनी त्या वेळी, बाळासाहेब ठाकरे हयात असताना, शिवसेना सोडण्याची हिंमत दाखवली हे खरे. पण तरी तसे करून ते तितक्याच तगडया पवारांच्या काँग्रेसी पदराखाली गेले. आपण स्वत:चा पक्ष काढावा असे काही त्यांना वाटले नाही. या सर्वात त्यातल्या त्यात जनतेत स्थान असलेले भुजबळच. त्यांना असे काही जमले नाही, ते इतरांस जमेल असे मानण्याचे कारणच नाही. पण त्यांच्यापेक्षा त्या गटात श्रेष्ठ अजितदादा. पण त्यांचे श्रेष्ठत्व काका शरद पवारांमुळेच आले, हे तेही नाकारणार नाहीत. शरद पवार हे काका नसते तर त्यांचे जे काही आज स्थान राज्याच्या राजकारणात आहे ते असते काय? अजितदादांपेक्षा मग राज ठाकरे अधिक धडाकेबाज ठरतात. त्यांनी निदान स्वत:च्या पायावर उभे राहून दाखवण्याची हिंमत तरी केली. मोठे पवार नाहीत तर धाकटे तर धाकटे याच विचारातून भाजपही अजितदादांना जाळयात ओढू पाहतो, हेही उघड आहे. बाकी दिलीप वळसे-पाटील, सुनील तटकरे वगैरेंविषयी न बोलणेच बरे. पवारांच्या प्रभावळीतील नसते तर वळसे-पाटील आदींना ग्रामपंचायतही जिंकता आली नसती हे सत्य. तथापि आयुष्यभर थोरल्या पवारांच्या उपकारांखाली राहणे त्यांना प्रशस्त न वाटणे अगदी साहजिक. त्यामुळे त्यांनी अधिक विकासासाठी आणि त्याहीपेक्षा 'केलेला विकास' सुरक्षित राहावा यासाठी थोरल्या पवारांना सोडले हेही साहजिक. पण साहजिक नाही ते आशीर्वादाचे नाटक. आता एकदा गेला आहात ना दुसऱ्या घरी? तर मग राहावे आनंदाने आणि आत्मविश्वासाने. या असल्या आशीर्वाद वगैरे थोतांडांची गरजच काय?

त्याच वेळी तो देण्याची थोरल्या पवारांना गरज काय; हाही प्रश्नच. खरे तर आशीर्वाद देणे म्हणजे या सर्वांना त्यांनी 'गेल्या घरी तुम्ही सुखी राहा' असे आणि इतकेच सांगणे. त्यात अधिक शहाणपण. पण तरीही एकदा नाही तर पाठोपाठ दोन दिवस दोन वेळा ते या 'गेलेल्यांना' भेटणार असतील तर या 'गेलेल्यांविषयी' त्यावर जितका संशय घेतला जाईल त्यापेक्षा अधिक त्यांना 'जाऊ देणाऱ्यावर' घेतला जाईल. म्हणजेच यामुळे थोरल्या पवारांचे हेतू संशयास्पद ठरतील. भाजपशी नाही ना तुम्हास हातमिळवणी करायची? मग त्यांच्याशी हातमिळवणी करणाऱ्यांचे एकांतात कसले आदरातिथ्य करता? त्यामुळे त्यांच्यासमवेत जे कोणी मागे राहिले त्यांनाही असेच पुढे गेलेल्यांसारखे करणेच योग्य असे वाटेल. सतत संशय निर्माण करणे हा राजकारणात गुण खराच. पण त्यास कोठे आवर घालावा हे लक्षात आले नाही तर स्वत:विषयीच संशय निर्माण होण्याचा धोका असतो. तो पवार यांच्याबाबत संभवतो. तेव्हा राज्याच्या विकासासाठी विरोधी गटातल्या राष्ट्रवादीतून सत्ताधारी भाजपच्या कळपात स्वत:हून गेलेल्यांस थोरल्या पवारांनी – तेही दोन-दोनदा – भेटण्याचे काही कारणच नाही. हे असेच सुरू ठेवायचे असेल तर उद्या या मंडळींच्या मतदारसंघात त्यांच्याविरोधात प्रचारार्थ गेल्यावर त्यांचा पाहुणचारही थोरल्या पवारांनी जरूर स्वीकारावा. उगाच त्यांचे तरी मन का मोडा? खरे तर या प्रसंगी आशीर्वादाची सर्वाधिक गरज कोणास असेल तर ती एकनाथ शिंदे यांच्याबरोबर जिवाचा कोट करून शिवसेना सोडणाऱ्या आमदारमंडळींस आहे. त्यातले काही मोजके मंत्री झालेले सोडले तर बाकीच्यांची अवस्था 'ना खुदा मिला ना वस्ल-ए-सनम' अशी झालेली आहे. म्हणजे परमेश्वरही भेटला नाही आणि जिवलगाची गळाभेटही घेता आली नाही, असे. आशीर्वाद द्यायचा इतकाच मोह असेल तर थोरल्या पवारांनी खरे तर या मंडळींच्या जखमांवर फुंकर घालावी. त्याची अधिक गरज आहे.

आम्ही सर्व राष्ट्रवादीतून भाजपत गेलो ते राज्याच्या विकासासाठी अथवा देशविकासार्थ मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी असे अजितदादादी मान्यवर सांगतात. त्यावर मतिमंदही विश्वास ठेवणार नाहीत. देशाच्या विकासासाठी मोदी यांस या असल्या मंडळींची मदत लागणार असेल तर ते खरे तर खुद्द मोदी यांच्यासाठीही कमीपणाचे ठरेल. वास्तविक आपल्या जगन्मान्य नेत्यास देशविकासार्थ अजितदादा, प्रफुल्ल पटेल, भुजबळ अशा इतरांची मदत लागते याचा खरे तर या नेत्यांच्या भक्तगणांस संताप वाटावयास हवा. पण त्यांच्याकडून अशी काही वैचारिक अपेक्षा करणे व्यर्थ. अर्थात भ्रष्टाचार शिरोमणी सुखराम, आणीबाणी-अत्याचारकार विद्याचरण शुक्ल, विविध भ्रष्टाचार आरोपांतील काही तृणमूल नेते अशा शेकडोंस पचवून भाजपने दिलेला विकासाचा ढेकर देशाने अनुभवलेला आहेच. त्या भाजपस 'ईडी'ग्रस्त अजितदादा, प्रफुल्ल पटेल, भुजबळ, तटकरे आदीं मान्यवर काही पचवणे जड नाही. त्याच वेळी या अशा विकासाभिमुख नेत्यांमुळे 'ईडी'स तरी हायसे वाटेल. तेवढेच काम कमी!

अशा तऱ्हेने शिवसेना, राष्ट्रवादी पक्ष यांतील बंडाने सगळयांचे सगळे भले होत असताना या असल्या आशीर्वाद वगैरे नाटकाची गरजच काय? असे झाल्यावर बाकी कोणी नाही तरी या सर्वास पोटाशी कवटाळणाऱ्या भाजपने तरी त्यांना खडसावून विचारायला हवे : आशीर्वाद कसले मागता? कारण या मंडळींची ही अशी आशीर्वादाची इच्छा ही एक प्रकारे भाजपसाठी धोक्याचा इशारा ठरते.

# 'कमवा व शिका'तून नेमके काय मिळते?



महाविद्यालयीन आणि विद्यापीठस्तरीय विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' ही योजना राबवली जाते. आर्थिकदृष्टया दुर्बल आणि गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा हा योजनेमागचा उद्देश आहे. या योजनेचा गरीब घरांतील हजारो विद्यार्थ्यांना, विशेषत: ज्या कुटुंबांतील पहिली पिढी शिक्षण घेत आहे, त्यांना खूप फायदा झाला आहे. या माध्यमातून मिळणाऱ्या मानधनामुळे विद्यार्थी महिनाभराच्या मेसचा आणि शैक्षणिक शुल्काचा काही खर्च भागवू शकतात. परंतु ही योजना ज्या रीतीने राबवली जाते, त्यात अनेक दोष निर्माण झाले आहेत. त्यामुळे योजना मूळ हेतूपासून भरकटली आहे. मानवी संसाधनांचा सुयोग्य वापर करण्याची दृष्टीही त्यात राहिलेली नाही. त्यामुळे कमवा आणि शिका योजना आगामी आव्हाने पेलण्यासाठी अधिक कालसुसंगत होणे अत्यंत गरजेचे आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उदाहरण घेऊ या. विद्यापीठाच्या मार्गदर्शिकेनुसार या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत- आर्थिकदृष्टया दुर्बल आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी मदत करणे, मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे, विद्यार्थ्यांना ज्ञानसेवक बनवणे, स्वयंरोजगाराबाबत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृतीची जाणीव निर्माण करणे वगैरे. ही उद्दिष्टे कागदावर वाचायला निर्दोष वाटत असली, तरी या योजनेची अंमलबजावणी विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन पातळीवरील उद्दिष्टांना धरून होतेच असे नाही. ही योजना केवळ राबवायची म्हणून राबवली जाते का, असा प्रश्न पडतो. विद्यार्थ्यांना ज्ञानसेवक बनवण्यासारखे उद्दिष्ट तर अंमलबजावणीत कुठेही अस्तित्वात नाही. कमवा व शिका या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दोन प्रकारची कामे दिली जातात. एक 'फील्ड वर्क' आणि दुसरे 'ऑफिशियल वर्क'. 'फील्ड वर्क'मध्ये मुख्यत: नर्सरीची कामे सांगितली जातात. त्यात खोदकाम करणे, बिया गोळा करणे, रोपे लावणे, रोपांना रोज पाणी देणे वगैरे. शिवाय विद्यापीठात किंवा महाविद्यालयांत आयोजित केल्या जाणाऱ्या काही प्रदर्शन अथवा कार्यक्रमांत सजावट करण्यापासून ते खुर्च्या लावण्यापर्यंत सगळीच कामे करून घेतली जातात. कधी कधी स्वच्छतेच्या नावाखाली कचरा, प्लास्टिक, बाटल्या गोळा करायलाही लावले जाते. ऑफिशियल वर्कमध्ये लायब्ररीमध्ये पुस्तके लावून घेणे, त्यावर क्रमांक लिहिणे, विद्यार्थ्यांना पुस्तके देणे आणि त्याच्या नोंदी ठेवणे; तसेच विद्यार्थ्यांच्या असाइनमेंट्स गोळा करणे, पत्र टाइप करून ती संबंधितांकडे पोहोचवणे, विविध कागदपत्रे हाताळणे, झेरॉक्स काढणे, ओळखपत्रे देणे, प्रयोगशाळेत प्राध्यापकांना साहाय्य करणे अशी कामे सांगितली जातात. ऑफिशियल कामांत विभागांमध्ये धूळ साफ करण्यास किंवा वस्तू नीटनेटक्या ठेवण्यासही सांगितले जाते.

उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रकारची कामे करायला लावून आपण काय साधतो? भारत हा तरुणांचा देश आहे असे ओरडून सांगितले जात असताना, या तरुणांच्या बुद्धीचा उपयोग त्यांच्यासाठी आणि देशासाठी करून घेण्याचा विचार का केला जात नाही? एक उदाहरण पाहा. एक विद्यार्थी बॅचलर्स इन व्होकेशनल स्टडीज (बी. व्होक.) हा अभ्यासक्रम करत आहे. पदवीधरांना रोजगारासाठी पुरेशा ज्ञानाबरोबरच कौशल्येही आत्मसात करता यावीत यासाठी बी. व्होक. हा अभ्यासक्रम असतो. यामध्ये विविध उद्योगांतील संधींनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते आणि कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते. असा अभ्यासक्रम करणाऱ्या एका विद्यार्थ्याला कमवा व शिका या योजनेत गेल्या वर्षभरात नर्सरीची कामे, साफसफाईची कामे, इव्हेंटची पोस्टर्स लावणे, खुर्च्या लावणे, पिशव्या शिवणे अशी कामे देण्यात आली.

आणखी एक उदाहरण पाहा. एक विद्यार्थी अर्थशास्त्रात पदवीचे शिक्षण घेत आहे. त्याला महाविद्यालयाच्या वाचनालयातील पुस्तकांवर क्रमांक टाकणे, ती नीट लावणे, ओळखपत्रे स्कॅन करणे आणि भौतिकशास्त्र विभागातील (जो त्याचा विभागच नाही) विद्यार्थ्यांच्या असाइनमेंट अपलोड करणे याशिवाय दुसरे कामच दिले गेले नाही. विद्यार्थ्यांशी बोलताना अशा अनेक गोष्टी समजतात. त्यांचे म्हणणे असे की, कमवा व शिकाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपण शिकतोय त्याच विभागात काम करण्याची संधी मिळतेच असे नाही. महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना सांगितल्या जाणाऱ्या कामाचा आणि अभ्यासक्रमांचा काहीच संबंध नसतो. एका महाविद्यालयात कमवा व शिकामध्ये काम करणारा एक अंध विद्यार्थी तर म्हणाला, 'शिपाईपदाच्या पेक्षाही खालच्या दर्जाची कामे आम्हाला सांगितली जातात.'

या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्रातील शिक्षकेतर संघटनांनी विविध मागण्यांसाठी आंदोलने केली आणि आपल्या मागण्या राज्य सरकारपुढे ठेवल्या. त्यातली एक मागणी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरा ही होती. मात्र सरकार अशी भरती करण्यास अनुकूल नाही. विद्यापीठांकडून आणि महाविद्यालयांकडून आवश्यक कामे कंत्राटी तत्त्वावर करून घेतली जातात. कमवा व शिका या योजनेतील विद्यार्थ्यांकडे स्वस्त शिक्षकेतर (शिपाई) कर्मचारी म्हणून पाहिले जात आहे का, महाविद्यालयांना असलेली शिपायांची गरज कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांमार्फत भागवली जात आहे का, असे प्रश्न उपस्थित होतात. मागच्या वर्षी केवळ पुणे विद्यापीठामध्ये आणि विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये कमवा व शिका योजनेअंतर्गत अंदाजे नऊ ते दहा हजार विद्यार्थी काम करत होते.

एकीकडे 'स्किल इंडिया'चा गाजावाजा होत आहे, पण विद्यापीठ स्तरावर त्याची जी अंमलबजावणी करण्याची संधी कमवा व शिका योजनेतून साधता येऊ शकते. आपण ती संधी गमावत आहोत. जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन बाहेरच्या जगात नोकरी मिळवण्यासाठी जाणार आहेत, ते कमवा व शिकामध्ये निव्वळ अल्प प्रमाणात कौशल्यांची आवश्यकता असलेली (अनस्किल्ड्) कामे करताना दिसत आहेत. या योजनेत विद्यार्थ्यांना जी कामे सांगितली जातात, ती ते मुकाटयाने स्वीकारतात. कारण महिन्याकाठी काही रक्कम त्यांच्या पदरी पडणार असते. पण अनेक विद्यार्थ्यांना अशी कामे आवडत नाहीत, मात्र त्यांच्या स्वप्रतिमेला धोरणकर्त्यांच्या विचारचौकटीत काही कमित आहे, असं वाटत नाही. श्रमप्रतिष्ठेचा चुकीचा अर्थ लावून तोंडाला पाने पुसण्याचाच उद्योग आतापर्यंत होत आला आहे. या योजनेकडे गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना होणारी मदत एवढया संकुचित दृष्टीने न बघता, त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने कौशल्य प्रशिक्षण योजना म्हणून पाहिले गेले पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाशी संबधित आणि कौशल्याधारित कामे मिळणे, त्यातून त्यांच्या अनुभवात भर पडणे गरजेचे आहे. असे झाले तर ही योजना प्रत्यक्ष काम आणि त्यासाठी लागणारी कौशल्ये यातली दरी मिटवणारी ठरू शकेल.

जाताजाता 'कमवा व शिका'अंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मानधनाबद्दलही बोलले पाहिजे. विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या मेसचे आणि वसतिगृहांचे दर वाढले आहेत, पण कमवा व शिका योजनेचे मानधन मात्र तेवढेच आहे. वाढत्या महागाईमुळे या योजनेच्या माध्यमातून मिळणारे पैसे विद्यार्थ्यांना परवडेनासे झाले आहेत. नव्या शिक्षण धोरणाअंतर्गत कौशल्याधारित आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणे आणि 'स्किल इंडिया'च्या माध्यमातून कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यातील दरी कमी करणे ही केंद्र सरकारची उद्दिष्टे आहेत. पण महाविद्यालयांतील विद्यार्थी कमवा व शिकाअंतर्गत अकुशल कामगारांनाही शक्य होतील, अशी कामे करत आहेत? हे धोरणकर्त्यांना दिसत नाही का? वास्तविक दोन्ही धोरणांमध्ये कमवा व शिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण कामे देण्याची तरतूद केली जाऊ शकते. महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे झाल्यास उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'कमवा व शिका' योजनेसाठी राज्यात लवकरच धोरणाची निर्मिती करण्यात येणार असून या धोरणांतर्गत इतरही खासगी संस्था, कंपन्यांना सहभागी करून घेण्यात येईल, असे नुकतेच जाहीर केले. हे धोरण विद्यार्थ्यांतून कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणारे ठरो, एवढीच अपेक्षा!

# दहशतवादाच्या कार्यपद्धती बदलत आहेत



२१व्या शतकात दहशतवादाने जागतिक सुरक्षितता व स्थायित्वासमोर गंभीर आव्हान निर्माण केले आहे. पण ती काही नवीन घडामोड नाही. एक राजकीय विचारधारा म्हणून दहशतवाद समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास या प्रवृत्तीची मुळे इतिहासात खोलवर रुजल्याचे स्पष्ट होते. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात विशेषतः फ्रान्समध्ये, क्रांतिकारी दहशतवादाच्या रूपातील हिंसा, व्यापक स्वरूपातील दहशतीचे निदर्शक होती. वसाहतिक कालखंडात पश्चिमी साम्राज्यवादी देशांनी आपल्या हितसंबंधाचे संवर्धन करण्यासाठी दहशतीचाच आधार घेतला होता. शीतयुद्धाच्या कालखंडात वर्चस्ववादी राजकारणात दहशतवादाचा क्रूर अनुभव विश्वसमुदायाला आला. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर नवउदारमतवादी, नवसनातनवादी उजव्या शक्ती जागतिकीकरणाच्या रूपात जसजशा सक्रिय होत गेल्या, तसतशी दहशतवादी कारवायांत प्रचंड वाढ होत जाऊन सारे जग सततच्या अत्याचारी, हिंसक कृत्यांमुळे भयग्रस्त झाले आहे. आज दहशतवादाच्या कार्यपद्धतीत व स्वरूपात आमुलाग्र बदल झाले आहेत.

विश्वसमुदायात अभावानेच एखादे राष्ट्र असे असू शकेल, की ज्याला दहशतवादाची झळ लागलेली नाही. सामाजिक, आर्थिक, वैचारिकदृष्ट्या असंतुष्ट आणि मानसिकदृष्ट्या विकृत असणाऱ्यांना दहशतवादी संघटनांत भरती करून आपले संकुचित ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न कमी अधिक प्रमाणात सर्वच देशांत झाला. एकीकडे धार्मिक उन्माद, अमली पदार्थांच्या व्यापारातून कमाई, संकुचित, स्वार्थी ध्येयसिद्धीसाठी दशहतवादाचा हत्यार म्हणून वापर सर्रासपणे केला जात आहे. तर दुसरीकडे दहशतवादविरोधाच्या नावाखाली राज्येही दमनचक्राचा वापर करून दहशतवाद्यांच्या रांगेत उभी राहत आहेत.

'दहशतवाद' नेमके कशाला म्हणावे, याबाबत वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहता येते. त्यामुळे त्याची सर्वमान्य, समावेशक व्याख्या अद्याप अभ्यासक, संशोधक वा तज्ज्ञांना करता आलेली नाही. याला कदाचित कोणी अभ्यासकांचा पूर्वग्रहाधारित संकुचितपणा म्हणू शकेल किंवा बौद्धिक मर्यादा. वस्तुस्थिती अशी आहे, की दहशतवादाला कोणी 'विवेकी वर्तन' (राजकीय उदिष्टसिद्धिसाठी हेतूतः केलेले वर्तन या अर्थाने) संबोधते, तर कोणी 'अविवेकी, अवैध वर्तन' संबोधते. (युद्ध किंवा क्रांतीला वैधानिक अधिष्ठान जसे दिले जाते तसे दहशतवादी वर्तनाला दिले जात नाही.) निरपराध, निःशस्त्र नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या हिंसक कृतीला, कृती करणाऱ्या अभिकर्त्या घटकाला कोणी 'दहशतवादी' म्हणते, तर कोणी 'स्वातंत्र्य योद्धे' (जनरल मुशर्रफ यांनी जम्मू-कश्मिरात हिंसक कारवाया करणाऱ्यांना स्वातंत्र्ययोद्धे संबोधले होते) संबोधतात. दहशतवादाला विविध व्याख्यांतून परिभाषित करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यांचा एकत्रितरित्या विचार केला असता संकल्पनीकरण करताना चार दृष्टिकोन देता येतात.

अ) चुकीच्या गृहितकावर आधारित

दहशतवाद या समस्येचा प्रथमच अभ्यास करतात, ते अभ्यासक साधारणपणे या पहिल्या दृष्टिकोनांतर्गत येतात. चुकीच्या गृहितकांवर दहशतवाद समजून घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे निष्कर्षही चुकीचेच निघतात. याचे मुख्य कारण म्हणजे दहशतवाद ही जगातील सर्वाधिक भावात्मक (इमोटिव्ह) व वादग्रस्त (डिव्हिझिव्ह) संकल्पना असल्यामुळे अभ्यासकांच्या जाणिवेत फरक पडत जातो.

ब) एक विचारप्रणाली किंवा चळवळ

या दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व राजकीय नेते, सुरक्षा अधिकारी, माध्यमांतील मंडळी करतात. ही मंडळी दहशतवादाला विशिष्ट अर्थ देण्याचा प्रयत्न करतात, परंतु दहशत ही मुळातच गुंतागुंतीची प्रक्रिया असल्यामुळे अर्थाबाबत वस्तुनिष्ठता व सातत्य राहत नाही. बहुतेक दहशतवादी घटना विस्तृत राजकीय संघर्षाच्या संदर्भात घडतात ज्यात 'दहशत' ही प्रमुख व्यूव्हरचना असते. टिलीच्या (ऊग्त्त्व) मते, 'दहशतवाद ही विशिष्ट भावात्मक श्रद्धा असण्यापेक्षा व्यूव्हरचना अधिक आहे, ज्यात दहशतवादी संघटना, परिस्थिती व श्रद्धांचा व्यापक प्रमाणात उपयोग करून घेतात.'

राजकीय हिंसाचाराचा प्रकार

या प्रकारचा दृष्टिकोन अभिकर्ताधारित (?क्टर-बेस) आहे. अराज्य घटकांकडून (नॉन स्टेट ग्रुप्स) नागरिकांवर होणाऱ्या हल्ल्यांना, 'राजकीय हिंसाचाराचा विशिष्ट प्रकार,' या सदरात ठेवून दहशतवादाला परिभाषित करण्याचा प्रयत्न या प्रकारच्या दृष्टिकोनात केला जातो. ब्रुस हॉफमन यांच्या मते, 'उपराष्ट्रीय गट किंवा अराज्य घटकांकडून करण्यात आलेली अवैध हिंसक कृती म्हणजे दहशतवाद.' अमेरिकी गृहखात्याने केलेली व्याख्याही या सदरात ठेवावी लागते. 'अवधान खेचण्यासाठी उपराष्ट्रीय गट किंवा गुप्त घटकांकडून (क्लँडेस्टाइन एजन्ट्स) राजकीय उद्दिष्टाने प्रेरित निःशस्त्र लोकांवर हिंसा लादणे म्हणजे दहशतवाद होय.' या व्याख्येत समाविष्ट करण्यात आलेला 'नॉन कॉम्बॅटन्ट' या शब्दातून निःशस्त्र नागरिक व निःशस्त्र किंवा कर्तव्यावर नसलेले सैनिक असा अर्थ ध्वनित करतो. वैधानिकदृष्ट्या विचार केल्यास अमेरिकी गृह खात्याने केलेली व्याख्या महत्त्वपूर्ण आहे. कारण यामुळे अशा कृत्यांत गुंतलेल्या लोकांना अटक वा दंड देण्यास राज्यांना वैधानिक आधार प्राप्त होतो. परंतु विश्लेषणात्मक पातळीवर विचार केल्यास काही शंका, प्रश्न वा अडचणी निर्माण होतात. 'राजकीय उद्देशाने प्रेरित हिंसा' असा मर्यादित अर्थ घेतल्यास क्रांती, यादवी, बेबंदशाही (मिलिटन्सी) दहशतवादाची तौलनिक फरकाची सीमारेषा पुसट होते. दुसरी अडचण म्हणजे, राज्याकडून नागरिकांचा छळ, हिंसा, राजकीय दबाव, भीतीचा वापर केला जात असला तरी त्यासंबंधित कृतींचा दहशतवादी कृतींत समाविष्ट करता येत नाही. कारण राज्य ही एक वैधानिक, सार्वभौम संस्था आहे. असे असले तरी हिंसा, मग ती राज्याने केलेली असो वा अराज्य घटकाने, अधिमान्यतेच्या संदर्भात प्रश्नचिन्हांकितच असते आणि राजकीयदृष्ट्या संशयास जागा निर्माण करते.

डाव्या विचारांच्या अभ्यासगटाकडून वरील दृष्टिकोनास हरकत घेण्यात येते. त्यांच्या मते, यामुळे अराज्य घटकांच्या अवैध हिंसक कृती दहशतवादाच्या कक्षेत येतात परंतु उजव्या गटातील पश्चिमी देशांच्या (कॅस्ट्रो-विरोधी गट, अंगोला व मोंझबिकमधील अमेरिका व दक्षिण आफ्रिका यांचे समर्थन असलेल्या हिंसक चळवळी, अफगाणिस्तानातील कारवाई, लॅटीन अमेरिकेत मृत्यूचे थैमान घालणारी पथके, इराकमध्ये मृत्यूचे तांडव घडविणारे गट) हिंसक कृती दहशतवादाच्या कक्षेबाहेर ठेवल्या जातात, जे पूर्णपणे अन्यायकारक आहे. यातून पश्चिमी उजव्या विचारांच्या देशांचे हितसंवर्धन होते. अर्थात याची कल्पना पाश्चिमात्य अभ्यासकांना नाही काय? ते जाणीवपूर्वक राज्य पुरस्कृत दहशतवादाकडे दुर्लक्ष करतात, असा डाव्या विचारांच्या अभ्यासकांचा आरोप आहे. यासाठी ते १९९० ते १९९९ या जगभरातील विविध प्रसिद्ध जर्नल्समधून दहशतवादावर लिहिण्यात आलेल्या विविध लेखांपैकी केवळ २७ टक्के लेखांतच राज्य समर्थित दहशतवादासंदर्भात शाश्वत मांडणी करण्यात आली आहे.

राज्य पुरस्कृत दहशतवादाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्यात अभ्यासकांना आलेले अपयश, अराज्य गट पश्चिमी हितसंबंधाच्या विरोधी असल्याची प्रतिमा निर्माण करते व दंडास पात्र ठरविण्यात येते. येथे प्रश्न हा निर्माण होतो की, राज्य किंवा राज्याच्या कोणत्याही अधिकृत एजन्सीकडून नागरिकांचा छळ, हत्या, दबाव, दहशतवादी कृतीमधून वगळले जाऊ शकते का? वसाहतवादी कालखंडापासून ते जागतिकीकरणापर्यंत, पश्चिमी देशांनी आपल्या हितसंबंधासाठी दहशत, हिंसा, भीतीचा सर्रास वापर केला आहे. एकट्या २० व्या शतकात २० कोटींपेक्षा अधिक लोकांच्या मृत्यूस राज्य जबाबदार आहे. जिथे प्रतिवर्षी अराज्य गटाकडून काही शेकडा लोक मारले जातात. आजही जगातील अनेक राज्यांत नागरिकांचा छळ, हिंसा, हत्या सुरूच आहेत. श्रीलंका, कोलंबिया, हैती, अल्जेरिया, झिम्बाबे, म्यानमार, पाकिस्तान, उझबेकीस्तान, कोरिया, इंडोनेशिया, फिलिपाईन्स सारखी राज्ये सामान्यांचा छळ, हत्या राजकीय स्वार्थासाठी करत आहेत. याबाबत वस्तुनिष्ठ अभ्यास होत नाही, ही मर्यादाच म्हणावी लागेल.

आजच्या स्थितीत दहशतवाद्यांच्या वर्तनासंदर्भात स्वीकृत सत्यांचे/ गृहितकांचे पुन:संकल्पनीकरण झाले पाहिजे. 'दहशतवाद दुर्बलांचे हत्यार आहे' हे जितके सत्य आहे, तितकेच बलशाली राज्याचेही लोकनियंत्रणाच्या नावाखाली दहशत हे एक साधन आहे. दहशतवादाच्या इतिहासाकडे वस्तुनिष्ठपणे पाहिले असता असे दिसते, दुर्बलांपेक्षा सबलांनीच दहशतीचा हितसंबंधाच्या रक्षणासाठी अधिक उपयोग केला आहे. राजकीय बदलांसाठी प्रतिस्पर्धी गटांत दहशत जाणीवपूर्वक पसरविण्यात आली. यामुळे हल्लीच्या दहशतवादाविरोधी कृती विशिष्ट स्थितीत दहशतवादी ठरवणे गैर नाही.

ड) विशिष्ट राजकीय उद्दिष्टासाठी हिंसक व्यूहरचना

साधारणपणे दहशतवादाचा अभ्यास करणारे बहुतांश अभ्यासक विशिष्ट राजकीय हेतूसाठी अभिकर्त्या घटकांकडून आखण्यात आलेली हिंसक व्यूव्हरचना किंवा डावपेच या अर्थाने दहशतवादाकडे पाहतात. दुसऱ्या शब्दात, अभिकर्त्या घटकाच्या स्वभाववैशिष्ट्यांपेक्षा, त्याने केलेल्या कृतीचे स्वरूप किंवा वैशिष्ट्याच्या आधारे दहशतवादाला समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. अथवा विस्तृत विचारधारा किंवा चळवळीच्या संदर्भात दहशतवादाला परिभाषित करण्यापेक्षा निश्चित डावपेचात्मक ध्येयप्राप्तीसाठी, विशिष्ट राजकीय कृतीच्या संदर्भात दहशतवादाला समजून घेणे अधिक पसंत केले जाते. लुई रिचर्डसन यांच्या मते, 'अधिकाअधिक लोकांपर्यंत संदेश संप्रेषित करण्यासाठी निशस्त्र किंवा प्रतिकात्मक लक्षांवर राजकीय उद्देशाने प्रेरित हिंसा, विध्वंस लादणे म्हणजे दहशतवाद.'

## जोडा...

पायापेक्षा का मोठा
उगाचं घेतला जोडा
लोक करी कुजबूज
शोभत नाही जोडा

कसे लागतीलं आंबे
बाभळीच्या रे झाडा
नवीन मिळाले काम
कचरा केवळ झाडा

युती आघाडी करता
विचार ना करे थोडा
चार पावले पळताचं
दमून थबकला घोडा

कोर्टात मारत चकरा
वेळ कसाबसा काढा
रोगा रामबाण उपाय
सापडेना भला काढा

रोज नव्यांनी केसेस
जिकडेतिकडे रे नडा
कसे सांभाळती वस्त्र
हाती आमच्या नाडा

कसेहीकरुन सरकार
म्हणतो लवकर पाडा
आपणानाही मिळाले
म्हणूनदुस-यास पिडा

काय होणारं जनतेचे
विचार कशाला थोडा
आम्हाला नाही खुर्ची
रे सत्ता तुम्हीही सोडा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**